# संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

जा.क्र. अधि. (कृषि)/तां.अ./परिपत्रक/ ३२ /२०२० दि. ०३/०६/२०२०

**वाचा :** संचालक (शिक्षण), कृषि परिषद, पूणे यांचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण–१/१११८/७३७, दि. २ जून, २०२०

## परिपत्रक

**विषय :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडी–अडचणींची सोडवणूक करण्याबाबत...

उपरोक्त संदर्भीत विषय आणि परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या सुरू असलेल्या कोविड–१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी (Lockdown) ची मुदत दि. ३० जून २०२० पर्यंत वाढविण्यात आलेली आहे, त्यामुळे राज्यशासनाच्या आदेशानुसार दि. ३० जून २०२० पर्यंत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था बंद राहणार आहेत हे आपणास विदितच आहे. सदर टाळेबंदी दरम्यान विविध महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना परिक्षा विषयक अडचणी उद्‌भवु शकतात. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या अडी–अडचणींचे संबंधीत महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर वेळीच निराकरण व सोडवणूक करणे महत्वाचे ठरते.

यानुषंगाने, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत सर्व कृषि व तत्सम शाखांच्या संलग्नित महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या परिक्षा विषयक व अनुषंगीक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी व उचित समाधानासाठी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपल्या महाविद्यालयातील संबंधीत नेमुन देण्यात आलेल्या समुपदेशक (Advisor), शिक्षण प्रभारी, सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य व उपकुलसचिव (विद्या) यांचेशी संपर्क साधावा. यानंतर संबंधीत विद्यार्थ्याचे उचित समाधान न झाल्यास निम्नस्वाक्षरीकर्ता अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक (शिक्षण) यांचेशी संपर्क साधावा असे विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

तसेच सर्वप्रकारच्या शैक्षणिक अभ्यासक्रम, उपक्रम, नियम आणि नियमावलीचे कार्यान्वयन विद्यापीठामार्फत करण्यात येत असल्यामुळे सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेस थेट संपर्क करण्याची आवश्यकता नाही ही बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी. विद्यार्थ्यांच्या शिक्षण विषयक शिष्यवृत्ती, आंतरविद्यापीठीय/आंतरमहाविद्यालयीन बदल्या, परिक्षांचे निकाल, पुनर्मुल्यांकनाचे निकाल, परिक्षांचा कालावधी, निकालाचा कालावधी, नोंदणी प्रक्रीया इत्यादी अनुषंगीक बाबी संदर्भात संबंधीत विद्यार्थ्याने विद्यापीठाशी व शिक्षणविषयक प्रतिनिधीशी संपर्क करावा अशा सुचना देखील देण्यात याव्यात.

यास्तव, निर्देशित करण्यात येते की, कृषि विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य यांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक विद्यार्थ्यांच्या माहीतीस्तव महाविद्यालयाच्या सूचना फलक/संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

उक्त निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

संचालक शिक्षण तथा
अधिष्ठाता (कृषि)
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**प्रतिलिपी :**

१. सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ........................................
२. कुलसचिव, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीस्तव अग्रेषित.
३. उपकुलसचिव (परिक्षा विभाग), डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहीतीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव
४. प्राचार्य, सर्व कृषी व संलग्न महाविद्यालये ........................................
५. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक यांना मा. कुलगुरू, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांच्या माहीतीस्तव.

Scanned with CamScanner